**<u>रे मु नं. ४३६/२०२२ मध्ये नि.२३ वर आदेश</u>**
(काशीनाथ विश्वनाथ बुधवंत वि. भामाबाई विश्वनाथ बुधवंत)

प्रस्तुतचा अर्ज वादीने नि.क्र.१८ वरील आदेशाप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुतच्या अर्जात कथन केले आहे की सदर प्रकरणात वादीने नि. क्र १८ वर दुरुस्तीकामी अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज नि.१८ मंजूर करण्यात आलेला होता व त्याप्रमाणे १४ दिवसात दुरुस्ती करणे जरुरीचे होते. परंतु वादीकडून नजरचूकीने दुरुस्ती करण्याचे राहून गेले त्यामुळे १४ दिवसात वादीला दुरुस्ती करता आली नाही. सबब वादीला नि.१८ वरील आदेशाप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादीचे म्हणणे मागवले असता प्रतिवादीने म्हणणे दिले आहे की अर्ज खरा नाही व मुदतीत नाही त्यामूळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १८ प्रमाणे ज्या पक्षकाराने सुधारणा करण्याच्या परवानगीचा आदेश मिळवला असेल त्या पक्षकाराने, आदेशाद्वारे त्या प्रयोजनार्थ नेमून दिलेल्या कालमर्यादित आणि किंवा कालमर्यादा दिली नसल्यास, आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत त्यानुसार सुधारणा केली नाही तर, उपरोक्त प्रमाणे अशी काल मर्यादा किंवा यथास्थीती, असा १४ दिवासांचा कालवधी संपल्यानंतर, न्यायालयाने मुदत वाढवून न दिल्यास त्या पक्षकारास त्यात सुधाराणा करण्याची परवानगी दिली जाणार नाही. परंतु मा. मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयात क्रम ६ नियम १८ ची प्रक्रिया काटेकोरपणे राबवली तर ते न्यायोचित ठरणार नाही. तसेच मुदत निघून गेल्यावरही कोर्ट खर्च बसवून दुरुस्तीची परवानगी देउ शकते असे प्रतिपादित केले आहे. Salmona Villa Hsg. Cooperative Soc. Ltd. Vs. Mary Fernandis and Ors. AIR 1997 Bom 208 मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी असे निर्देशित केले आहे की 'procedure under Rule 18 of Order 6 should not be applied so rigorously and with hyper technical stress that it breaks the strings of substantial justice”

५.		प्रकरण पाहिले असता नि.१८ वर वादीने दावा दुरुस्तीचा अर्ज दिला होता. सदरचा अर्ज दि.२९.०८.२०२३ रोजी रु २००/- कॉस्ट आकारुन मंजूर करण्यात आला व वादीला १४ दिवसात दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु वादीकडून नजरचूकीने दि. २९/०८/२०२३ रोजीच्या आदेशाप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याचे राहून गेल्याचे वादीने कथन केले आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे सालमोना विला को.ऑप हौ सोसायटी (सुप्रा) मधील वरील नमूद निर्देश तसेच वादीने प्रस्तुत अर्जात दिलेले कारण लक्षात घेता सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो आणि वादीला नि.क्र. १८ च्या आदेशानुसार दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. परंतु सदरचा अर्ज रु. १००/- कॉस्ट वादीने प्रतिवादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादीला रक्कम रु. १००/- कॉस्ट देउन त्वरित दाव्यात नि.क्र १८ च्या आदेशानुसार दुरुस्ती करावी.

sd/-

दि. १२/०२/२०२४

(श्रीमती एस. यू. जागुष्टे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर व
शेवगाव